11 JAN 2018
लोकमत

# वि. स. खांडेकर जयंतीनिमित्त माहितीपट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भाषाभवन येथील वि. स. खांडेकर संग्रहालय यांच्या वतीने आज, गुरुवारी सकाळी १०.३० वाजता वि. स. खांडेकर तथा भाऊ यांच्या १२० व्या जयंतीनिमित्त वि. स. खांडेकर संग्रहालय माहितीपटाचे अनावरण विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. तसेच, शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभही होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2018
पुण्यनगरी

# 'राजाराम' मध्ये रसायनशास्त्र परिषदेला सुरुवात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राजाराम महाविद्यालयामध्ये दोनदिवसीय रसायनशास्त्र विद्यार्थी परिषदेस प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जी. एस. गोकावी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. ए. एस. खेमनर अध्यक्षस्थानी होते. डॉ. गोकावी यांनी जगाला भेडसावणाऱ्या प्रदूषणाचा प्रश्न विषयावर माहिती दिली. दैनंदिन जीवन सुसह्य व प्रदूषणमुक्त करण्यासाठी नैसर्गिक ऊर्जा स्रोत वापरून नवीन संशोधनाची गरज त्यांनी अधोरेखित केली. विवेकानंद कॉलेज, गोखले कॉलेज, शहाजी कॉलेज, शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभाग, नॅनो सायन्स व नॅनो टेक्नॉलॉजी, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, भारती विद्यापीठाच्या फार्मसी कॉलेजने सहभाग घेतला. पोस्टर स्पर्धेत दोनशे, मॉडेल स्पर्धेत तीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. डॉ. बी. डी. भोसले, डॉ. ए. एम. खोमणे, डॉ. एस. झेड. जाधव, डॉ. अंकिता बोडके, अविनाश देशमुख उपस्थित होते. डॉ. के. के. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. जे. बोडके यांनी आभार मानले.